दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक ३३० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२३ फेब्रुवारी २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## खा.मोहन डेलकर यांचा मुंबईतील हॉटेलमध्ये आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दादरा – नगर हवेलीचे अपक्ष खासदार मोहन संजीभाई डेलकर (५९) यांचा मंबईतील मरिन ड्राईव्ह येथील सी ग्रीन साऊथ हॉटेलमध्ये मृतदेह आढळल्याने खळबळ माजली आहे. मुंबई पोलिसांना माहिती मिळताच घटनास्थळी पोलिसांचे पथक दाखल झाले असून पोलिसांकडून तपास सुरु करण्यात आला आहे. घटनास्थळी पोलिसांना गुजराती भाषेत सुसाईट नोट सापडली आहे.



मोहन डेलकर यांनी आत्महत्या केल्याची चर्चा आहे. मात्र, पोलिसांनी अद्याप अधिकृत माहिती दिलेली नाही. आज दुपारी १२ वाजता हॉटेलमधून पोलिसांना या धक्कादायक घटनेची माहिती मिळाली. हॉटेलच्या पाचव्या मजल्यावर डेलकर यांचा मृतदेह आढळून आला. डेलकर यांच्या पश्चात पत्नी कालाबेन डेलकर आणि एक मुलगा अभिनव, एक मुलगी दिविता असा परिवार आहे.

# पाणी हेच जीवन..पाणी जपून वापरा : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**सध्या राज्य देश संपूर्ण जग करोना सारख्या भीषण संकटाशी मुकाबला करीत आहे त्याचबरोबर पाणी ही देखील मोठी समस्या आहे पाणी हेच जीवन असून पाणी जपून वापरा, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी सर्व जनतेला आज पनवेल तालुक्यातील भोकरपाडा येथे केले महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारीतील नावाशेवा टप्पा तीन पाणी पुरवठा योजना भूमिपूजन सोहळा पनवेल तालुक्यातील भोकरपाडा येथे आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.**



यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, नगर विकास सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, राज्यमंत्री तथा पालकमंत्री रायगड कु. आदिती सुनील तटकरे, जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी, पनवेल महानगरपालिका महापौर डॉ. कविता चौतमोल, खासदार श्रीरंग बारणे, खासदार सुनील तटकरे, सर्वश्री आमदार बाळाराम पाटील अनिकेत तटकरे, भरत गोगावले महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे, पंचायत समिती पनवेल सभापती देवकी कातकरी, ग्रामपंचायत खानावळे सरपंच जयश्री नाईक, ग्रामपंचायत बारवाई सरपंच नियती बाबरे, जेएनपीटी चे अध्यक्ष संजय सेठी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव संजय चहांदे, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,सिडको डॉ. संजय मुखर्जी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव किशोर राजे निंबाळकर, जिल्हाधिकारी निधी चौधरी, पोलिस उपमहानिरीक्षक संजय मोहिते, नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, पनवेल महानगरपालिका आयुक्त सुधाकर देशमुख, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, पुरुषोत्तम कराड, सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन भोसले पाटील हे उपस्थित होते.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, मी आयोजकांना धन्यवाद देतो. कालच मी फेसबुक लाईव्ह च्या माध्यमातून प्रेमाने आणि हक्काने सूचना दिल्या होत्या. एकीकडे मी सांगतोय की,सार्वजनिक कार्यक्रम करू नका आणि आज आपण हा रायगड येथील कार्यक्रम करतोय, पण हा कार्यक्रम जनतेच्या जिव्हाळ्याचा आणि मुख्य म्हणजे पाण्याशी संबंधित आहे.

मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी सर्वप्रथम आरोग्याचे काटेकोर नियम पळून हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले व ते पुढे म्हणाले की,पाणी म्हणजे आयुष्य आहे. विकासाच्या अनेक गोष्टी आपण करतोय. मेट्रोचे कोचेस देशात बनवतो आहोत. उद्या आपल्या राज्यातही हे कोचेस बनतील. अनेक गोष्टी आपण उत्पादित करू शकतो मात्र पाणी आपण बनवू किंवा निर्माण करू शकत नाही हे सत्य आहे. एकदा हे स्वीकारल्यानंतर मग आपल्या हाती असते ते उपलब्ध पाणी कसे जपून वापरू. ते म्हणाले की, माणूस तहान लागली की विहीर खणतो. पाण्याची पातळीही खूप खोल जात आहे. मी जव्हारला गेल्या आठवड्यात गेलो होतो, ते पूर्वी हिल स्टेशन होते आणि पुढेही आपण त्याला चांगले विकसित करणार आहोत. पण पाण्याचे दुर्भिक्ष्य काय असते, ती भीषण वस्तुस्थिती तिथे गेल्यावर पहायला मिळते. परवा नीती आयोगाच्या बैठकीत मी मांडले की, ज्या विकासाच्या मागे आपण लागलो आहोत ते करताना निसर्गाचा ऱ्हास होता कामा नये. कोकणात सुंदर निसर्ग संपदा आहे, दुसरीकडे समुद्र किनारे आहेत पण पर्यावरणाला धोका पोहोचवून केलेला विकास आपल्याला नकोय. प्रदूषणकारी राक्षस आपल्याला परवडणार नाही. हा जीवघेणा विकास आहे. काही विशिष्ट कारखान्यांची खूप आवश्यकताच असेल तिथे लोकसंख्येपासून दूरवर किंवा ओसाड ठिकाणी त्यांना आवश्यक त्या सुविधा देऊन उभारावेत, मात्र त्यासाठीवनसंपदा नष्ट करता कामा नये.

करोनाच्या सुरुवातीच्या काळात सुविधा मिळत नव्हत्या, त्या काळात प्रदूषणाची पातळी खूप कमी झाली होती. आता परत काही दिवसांपासून हवेचे प्रदूषण वाढले आहे. प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार वाढू लागले आहेत, अशी चिंता व्यक्त करून मुख्यमंत्री श्री.ठाकरे पुढे म्हणाले की, भारताच्या स्वातंत्र्याला ७५वर्षे पूर्ण होतील पण पिण्याचे पाणी गावागावात घेऊन जाऊ शकलो नसलो तर काही अर्थ नाही. मंगळावर पाणी सापडले आहे किंवा नाही हे उत्सुकतेने आपण तपासतो पण अगोदर आपण आपल्याकडील मूलभूत सुविधा आहेत का ते पाहणे गरजेचे आहे. मुंबई लगतच्या या रायगड जिल्ह्यात लोकसंख्या वाढत आहे, पिण्याच्या पाण्याची सोय आपण नाही केली तर भविष्यात गंभीर समस्या निर्माण होतील. त्यामुळे हा प्रकल्प वेळेत नव्हे तर वेळेआधी पूर्ण करा, त्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल, असे सांगून केवळ रायगडच नव्हे तर आपल्याला संपूर्ण महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करायचा आहे, असा निर्धार त्यांनी शेवटी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या मनोगतात म्हणाले की, जगामध्ये यापुढील भांडणे पाण्या साठीच होतील,राज्याराज्यात, जिल्ह्याजिल्ह्यात,गावागावत पाण्याकरिता वाद होऊ नयेत यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग सारख्या उपाययोजना करणे, लोकांनी जलसाक्षर बनणे, ही काळाची गरज बनली आहे. करोनाने पुन्हा आपले डोके वर काढले आहे. त्यामुळे सर्वांनीच काटेकोरपणे आपली,आपल्या कुटुंबाची,समाजाची काळजी घ्या. जनतेने नियमांचे पालन केल्यास पुन्हा लॉकडाऊनची गरज भासणार नाही,याची काळजी घेण्याची वेळ आली आहे. अनिल देशमुख, जयंत पाटील, सतेज पाटील, छगन भुजबळ करोनाग्रस्त झाले. सध्याच्या परिस्थितीला लोकांनी गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. लोकांमधील भीती करोना विषयीचे गांभीर्य निघून गेले आहे. त्यामुळे परिस्थिती अधिक बिकट बनण्याआधीच आपण सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे, असे आवाहन करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारीतील न्हावाशेवा टप्पा–३ पाणीपुरवठा योजनेसंबंधी त्यांनी संबंधितांना कामाचा दर्जा उत्तम राखावा, काम वेळेत पूर्ण करावे आणि त्या कामात कुठलीही उणीव राहणार नाही, यासाठी सरकार दक्ष राहील, अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी सुभाष भुजबळ मुख्य अभियंता, ठाणे, चंद्रकांत गजभिये,अधीक्षक अभियंता पनवेल, दीपाली देशपांडे – सावडेकर,मुख्य प्रशासकीय अधिकारी,मुंबई, प्रशांत भामरे, अधीक्षक अभियंता,मुंबई, प्रल्हाद पांडे, अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) मुंबई, नामदेव जगताप, शाखा अभियंता, रमेश वायदंडे, शाखा अभियंता, पनवेल जी.ए.कुलकर्णी,शाखा अभियंता, पनवेल, डी. आर. अनुसे,शाखा अभियंता,पनवेल,भरत कुमार पवार,शाखा अभियंता, विजय सूर्यवंशी कार्यकारी अभियंता पनवेल,अर्जुन गोळे, पनवेल, सुरेंद्र भोसले, उप अभियंता यांत्रिकी, के.बी.पाटील,शाखा अभियंता, स्वप्निल सुळे, शाखा अभियंता,श्री. बिर्ला,उपविभागीय अभियंता,माथेरान,सूर्यकांत वाडिले,शाखा अभियंता, पनवेल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर, अंकुश खेडकर, संजय पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.पगार, श्री.फरताडे, श्रीमती बिडवे, श्री.हाश्मी, श्री.आकाश पवार या सर्वांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त...

### दहावी आणि बारावीच्या परीक्षा प्रत्यक्ष होण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दहावी आणि बारावीच्या परीक्षा आता ऑफलाईन होण्याची शक्यता आहे. ऑनलाईन परीक्षा घेण्यास बोर्ड सध्या अनुकूल नसल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागानं हा निर्णय घेतला असून दहावी बारावीच्या परीक्षांचा शालेय शिक्षण विभागाकडून आढावा घेण्यात आला.

सध्या राज्यात पुन्हा एकदा कोरोनानं आपलं डोकं वर काढलं आहे. अनेक जिल्ह्यांत कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे. अशातच दहावी आणि बारावीच्या परीक्षा आणि प्रॅक्टिकल परीक्षा पुढच्या महिन्यापासून सुरु होणं अपेक्षित आहे. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने दहावी बारावीच्या परीक्षांसंदर्भात आढावा घेतला होता. यावेळी दहावी, बारावीच्या परीक्षा प्रत्यक्ष घेण्याचा पर्याय असू शकतो का? परीक्षा ऑनलाईन घेता येतील का? अशी चर्चा करण्यात आली. त्यावेळी शिक्षण विभागाने सांगितलं की, दहावी, बारावीच्या परीक्षांची तयारी पूर्ण झाली आहे. ऑनलाईन परीक्षा घेतली, तर ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टीव्हीटीचा विद्यार्थ्यांना फटका बसू शकतो. त्यामुळे जर परीक्षा घ्यायची असेल तर ती ऑफलाईनच झाली पाहिजे. परीक्षा केंद्रावर जाऊन विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार अशी त्यांनी भूमिका घेतली आहे.

दरम्यान, राज्यात दहावीचे १६ लाख तर बारावीचे १४ लाख विद्यार्थी आहेत. सध्यातरी दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या तारखांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव पाहून त्यानंतरच तारखांसंदर्भातील निर्णय घेतले जातील. परंतु, परीक्षा या ऑफलाईनच झाल्या पाहिजेत, अशी भूमिका शिक्षण विभागानं घेतली आहे.

## महिलेस वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या चौघांविरुद्ध खारघर पोलिसांची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका महिलेस वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणाऱ्या चौकडीविरुद्ध खारघर पोलिसांनी कारवाई केल्याने अशा प्रकारे अनैतिक धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पिडीत महीला, वय– २९ वर्षे ही माहे ऑगस्ट/२०२० पासुन दिनांक २७/०१/२०२१ रोजी पर्यंत तसेच गोमती ब्लीस स्पा व सलुन, शॉप क्र. २१, भूमि हाईट्स बिल्डींग, सेक्टर –८, खारघर येथे मसाजचे काम करत होती. यातील आरोपी आरोपी स्मिता शेख– शिवदास व सरबजितसिंग उर्फ बिल्ला हे दोघे वर नमुद ठिकाणी स्पा व सलुन चालवतात. या दोन्ही आरोपींनी वरील नमुद कालावधिमध्ये यातील पिडीत महीलेस वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले व त्याद्वारे आर्थिक उत्पन्न मिळवले. तसेच अटक आरोपी प्रथमेश कानसकर (स्मिता शिवदास हीचा मुलगा) याने दि. १०/०१/२०२१ रोजी व आरोपी सरबजितसिंग उर्फ बिल्ला याने दि. २२/०१/२०२१ रोजी फिर्यादी यांचेशी जबरदस्तीने शारीरीक संबंध केले. याबाबत फिर्यादी यांनी आरोपी व स्पा मालक स्मिता शिवदास हिच्याकडे वेळोवेळी तक्रार करुन देखील सदर आरोपीने दुर्लक्ष केले.

सदर त्रासाला कंटाळुन फिर्यादी यांनी दि. २७/०१/२०२१ रोजी काम सोडुन दिले. परंतु फिर्यादी यांनी काम सोडल्यानंतर देखील ..../२

## ठाण्याचे माजी महापौर अनंत तरे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । ठाणे**

ठाण्याचे माजी महापौर, माजी आमदार, कोळी समाजाचे ज्येष्ठ नेते आणि शिवसेना उपनेते अनंत तरे यांचे आज ठाणे येथील ज्युपिटर रुग्णालयात निधन झाले. ते ६६ वर्षांचे होते. अनंत तरे यांच्यावर मागील दोन महिन्यांपासून उपचार सुरू होते. मात्र, सतत त्यांची प्रकृती खालावत गेली आणि त्यातच आज त्यांची प्राणज्योत मालवली. तरे यांच्या निधनाने ठाण्याच्या जडणघडणीतील एक महत्त्वाचा दुवा निखळल्याची भावना व्यक्त होत आहे



मेंदूतील रक्तस्त्रावामुळे अनंत तरे यांना ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे दोन महिने ते उपचार घेत होते. त्यातच त्यांचा करोना चाचणी अहवाल पॉझिटिव्ह आला होता. त्यामुळे गुंतागुंत वाढत गेली आणि आज सायंकाळी पावणेपाच वाजताच्या सुमारास त्यांचे निधन झाले. तरे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन नातवंडे व भाऊ असा परिवार आहे. तरे यांच्या पार्थिवावर उद्या (मंगळवार) दुपारी दोन वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

ठाण्यात अनंत तरे या नावाला एक वलय होतं. एकेकाळी ठाण्याच्या राजकारणात तरे यांचा दबदबा होता. दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी तरे यांचा नेहमीच सन्मान केला. म्हणूनच तरे यांना तीनवेळा ठाण्याचे महापौरपद भूषवण्याचा मान मिळाला. शिवसेनेचे ते गेल्या अनेक वर्षापासून उपनेते होते. विधान परिषदेवरही ते निवडून गेले होते. महादेव कोळी समाजाच्या विविध प्रश्नांना वाचा फोडत त्यांनी अनेक आंदोलने केली होती. अखिल भारतीय कोळी समाज संघटनेचे ते अध्यक्ष होते. कार्ला येथील एकविरा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले.

## कामगारांच्या उन्नतीसाठी सर्वोत्तपरी सदैव सहकार्य करीत राहणार : आ.प्रशांत ठाकूर

**विस्तारित कार्यालयाचे आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उदघाटन**



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामगारांना न्याय मिळालाच पाहिजे हि आपली कायम भूमिका असते, त्यामुळे कामगारांच्या उन्नतीसाठी सर्वोत्तपरी सदैव सहकार्य करीत राहणार, अशी ग्वाही भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी तळोजा औद्योगिक क्षेत्र येथे केले.

ऑल इंडिया माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन या कामगार संघटनेच्या तळोजा एमआयडीसी येथील विस्तारित कार्यालयाचे उदघाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार प्रधानत ठाकूर यांनी पुढे बोलताना म्हंटले कि, तळोजा औद्योगिक क्षेत्रामध्ये विविध प्रकारचे अनेक कारखाने आहेत. त्यामध्ये माथाडी, ट्रान्सपोर्ट, जनरल असे विविध प्रकारचे कामगार गणले जातात. या सर्व कामगारांना वेगवेगळ्या पद्धतीने नेतृत्वाची गरज लागते. मला नक्की खात्री आहे नंदकुमार म्हात्रे त्या दृष्टिकोनातून त्यांना निश्चितपणे चांगले नेतृत्व देतील आणि त्यांना राजकुमार म्हात्रे व सहकारी कामगारांच्या उन्नतीसाठी ताकद देतील, असा विश्वास व्यक्त करून या परिसरामध्ये कामगारांचे शोषण–पिळवणूक होऊ नये, यासाठी हि संघटना काम करेल आणि त्यासाठी त्यांना लागेल ते सहकार्य आम्ही देऊ, अशी ग्वाहीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी दिली.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून पन–वेल महानगरपालिकेचे उपमहापौर जगदिश गायकवाड, शिवसेनेचे जिल्हा सल्लागार बबन पाटील, प्रभाग समिती सभापती अनिता पाटील, जीएसटी मुंबई विभाग आयुक्त राजेंद्र सरवदे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ..../२

## मुंबईत रिक्षाच्या आणि टॅक्सीच्या दरात ३ रुपयांची भाडेवाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईत रिक्षा आणि टॅक्सीच्या भाड्यात तीन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. रिक्षाचे भाडे १८ रुपयांवरुन २१ रुपये तर टॅक्सीचे भाडे २२ रुपयांवरुन २५ रुपये झाले आहे. मुंबई एमएमआर रिजनमध्ये ही भाडेवाढ लागू असेल, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांनी दिली आहे. १ मार्चपासून ही भाडेवाढ लागू होईल तर ३१ मेपर्यंत मीटर कॅलिबरेशन पूर्ण व्हायला पाहिजे, असंही अनिल परब यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

परिवहनमंत्री अनिल परब यांनी रिक्षा आणि टॅक्सी यांच्या दरात झालेल्या वाढीसंदर्भात माहिती दिली. तसेच त्यावेळी बोलताना खटुआ समितीच्या शिफारशीनुसार, एमएमआर रिजनमधील ..../२

## पोलादपूर कशेडी घाटात टेम्पो उलटून दोघांना गंभीर दुखापत

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील कशेडी घाटामध्ये भोगाव ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील येलंगेवाडी येथील तीव्र वळण उतारावर गोवा येथून गुजराज राज्यातील वापी येथे जाणारा टेम्पो कलंडून दोघेजण गंभीर जखमी झाले. यामध्ये एका महिलेचा समावेश आहे.

रविवार दि.२१ फेब्रुवारी २०२१ रोजी सायंकाळी आयशर टेम्पो (जी.जे.१५ एटीएम ७२३१) हा भोगाव गावाच्या हद्दीमध्ये कलंडून अपघात झाला. या अपघातात टेम्पोमधील माल



दरीमध्ये विखुरलेल्या अवस्थेत आढळून आला असून या अपघातामध्ये टेम्पोचालकासोबत एक महिला डोक्याला जबर दुखापत झाल्याने गंभीर जखमी झाली.

या अपघातात चालक टेम्पो चालक यादव याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून संगीता आण्णा जाधव (वय ४०) हिस डोकीस गंभीर दुखापत झालेली आहे. याखेरिज, सरिता प्रकाश जाधव हिस किरकोळ दुखापत झाली. या सर्वांना उपचारासाठी सरकारी दवाखान्यात पोलादपुर येथे तात्काळ रवाना केले. दरम्यान, कशेडी घाटातील वाहतूक सुरळीत करण्यात वाहतुक पोलीस कशेडी टॅप यांना यश आल्याची माहिती वाहतुक पोलीस सहायक फौजदार बोडकर यांनी दिली.

# ‘टोल’भैरवांचा छळवाद

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील टोल नाक्यांच्या भवितव्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने 'महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ' म्हणजे एमएसआरडीसीला दोन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा जो आदेश दिला आहे, त्याचे मनापासून स्वागत करायला हवे. उच्च न्यायालयात चार सामाजिक कार्यकर्त्यांनी जनहित याचिका दाखल केली असून तिची सुनावणी करताना न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. दीपांकर दत्ता यांनी हा आदेश दिला. यामुळे 'मुकी बिचारी कुणी हाका' बनलेल्या लाखो प्रवाशांच्या छळाला आणि वेदनेला निदान आवाज मिळाला आहे. या प्रकरणाची सुनावणी पुढे होणार असून न्याय मिळण्यास अजून अवकाश आहे. मात्र, या निमित्ताने साऱ्या राज्यातील सर्व टोल आकारणीचा आणि टोल नाक्यांच्या कारभाराची शहानिशा करण्याची गरज आहे. मुळात चांगले रस्ते देण्याची मूलभूत जबाबदारी सरकारांची आहे. ती तर पाळायची नाहीच; पण चांगल्या रस्त्यांची हूल दाखवून खासगी कंपन्यांना रस्तेबांधणीत घुसवायचे, त्यांना टोल आकारणीचे बेबंद अधिकार द्यायचे आणि भ्रष्टाचाराचे पाट राजरोस वाहवायचे, असा हा सारा गोरखधंदा आहे. याच्या तळाशी कधीतरी जाणे आवश्यक आहे. तसे ते गेले तर टोलच्या बदल्यात नागरिकांना खरोखरच किती सुविधा मिळतात, राज्यातील टोल आकारणी होणारे मार्ग आणि महामार्ग किती गुळगुळीत व अपघातमुक्त झाले आणि साऱ्या टोल आकारणीचा पारदर्शक हिशेब नागरिकांना सादर होता का, या साऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळतील. ती सरळ मार्गांनी दिली गेली नाहीत तर न्यायालयांनी जनतेसाठी हे काम करायला हवे. उघडपणे होणारी लूटमार थांबवायला हवी. 'टोल कधीही बंद होणार नाहीत,' असली बेमुर्वत विधाने करणाऱ्या मंत्र्यांनाही ताळ्यावर आणण्याची गरज आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर १५ वर्षांमध्ये चार हजार ३३० कोटी रुपये वसूल करण्याची अनुमती होती. हा रस्ता बांधणाऱ्या व टोल वसुली करणाऱ्या खासगी कंपनीने कागदोपत्रीच ३१ जुलै २०१९ पर्यंत तब्बल सहा हजार ६७३ कोटी वसूल केले होते. प्रत्यक्षात वसुली किती झाली असेल, हे एकटा ईश्वरच सांगू शकेल. याचे कारण, हा द्रुतगती मार्ग सुरू झाल्यानंतर दहा वर्षांनंतरचा वाहनसंख्येचा अंदाज पहिल्या दोन-तीन वर्षांतच ओलांडला गेला होता. मग वसुलीचे लक्ष्य पुरे झाल्याक्षणी एकतर सरकारने हा रस्ता आपल्या ताब्यात घेणे आवश्यक होते किंवा कंपनीने टोल वसूल करणे ताबडतोब थांबवणे आवश्यक होते. न्यायालयाला सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून असे झालेले दिसत नाही. हे प्रकरण आता तडीस लागायला हवे. हा प्रश्न केवळ या द्रुतगती मार्गापुरता नाही. आज महाराष्ट्रातले सारे महामार्ग 'टोलबंबाळ' झाले आहेत. मुंबईहून निघालेले प्रवासी कोल्हापूरपर्यंत पोहोचेपर्यंत कितीवेळा टोल देतात, याची तर गणतीच नाही. या बदल्यात त्यांना काय मिळते? अपघात झाले तर पुरेशी उत्तम रुग्णालये आहेत? विश्रांतीसाठी विस्तृत शामियाने आहेत? नेटकी स्वच्छतागृहे आहेत? फूडमॉलवरच्या सुविधा या सरकारने दिलेल्या नाहीत. कोल्हापूरकडे जाताना पुण्यानंतरचा रस्ता अनेक ठिकाणी अत्यंत खराब आहे. मग नागरिकांकडून ही कोट्यवधी रुपयांची वसुली कशासाठी होते? आता तर 'फास्टॅग'मुळे पैसे आपोआपच जाणार आहेत. प्रवाशांना दाद मागण्याचीही काही सोय नाही. काही काळापूर्वी मुंबई परिसरातल्या एका टोल नाक्याने दिवसभरात केवळ १६ वाहने पास झाल्याचा विक्रमी तपशील सादर केला होता. हा सगळा भ्रष्टाचार सरकारचे धोरण व अंमलबजावणी पारदर्शक नसल्याने होते आहे. टोलच्या विरोधात ज्यांनी मोठ्या वीरश्रीने आंदोलनाची शिंगे फुंकली तेही एव्हाना थंड पडले आहेत. खरेतर, या याचिकेच्या निमित्ताने उच्च न्यायालयाने राज्य सरकारकडे पारदर्शक आणि प्रामाणिक टोल धोरणाची मागणीच करायला हवी. सरकारला 'राज्य टोल प्राधिकरण' नेमण्याची सक्ती करायला हवी आणि त्यावर राज्यातल्या ग्राहक संघटनांचे प्रतिनिधीही असायला हवेत. वीजदराचे नियमन होऊ शकते; तर अब्जावधी रुपयांच्या टोल आकारणीचे नियमन व नियंत्रण का होऊ शकत नाही? 'फास्टॅग'मुळे केवळ आकारणीत तंत्रकौशल्य आले आहे. आकारला जाणारा टोल योग्य आहे किंवा नाही, हे 'फास्टॅग'मुळे कसे कळणार? आज खासगी वाहनांनी केवळ श्रीमंत जात नाहीत. नोकरी, व्यवसाय व इतर कामांसाठी प्रवास करावा लागतो. इंधनाचे दर आकाशाला भिडत आहेत. अशावेळी, वर्षानुवर्षे प्रवाशांकडून वाटमारी केल्यासारखी टोल आकारणी होत असेल तर ही लूट थांबायला हवी. उच्च न्यायालयात द्रुतगती मार्गाच्या निमित्ताने या साऱ्या प्रश्नांचा ऊहापोह होईल, अशी अपेक्षा आहे. मुळात, जीवनावश्यक सुविधांमध्ये खासगी कंपन्यांचा शिरकाव करणे आणि नंतर त्यांना शिरजोर होऊ देणे, हा राज्य हाकणाऱ्यांचा केवळ बेजबाबदारपणा नाही तर नैतिक गुन्हाच आहे. महाराष्ट्रातली ही कारस्थानी 'टोल'धाड आता तरी परतवून लावायलाच हवी.

# पनवेल परिसरातील नागरी प्रश्न सोडविण्यासाठी ना.एकनाथ शिंदे यांना घातले साकडे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील विविध नागरी समस्या सोडविण्यासाठी नगरविकास सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांना शिवसेना महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांनी भेट घेवून साकडे घातले आहे.

खारघर येथील एका कार्यक्रमादरम्यान नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांनी घेवून पनवेल महानगरपालिका हद्दीत येणाऱ्या विविध नागरी समस्या सोडविण्यासंदर्भात त्यांना माहिती दिली. त्यामध्ये प्रामुख्याने रस्ते, पाणी, गटार, विविध रेंगाळलेली विकास कामे, वाढणारा टॅक्स, बेकायदेशीर बांधकामे, कोव्हिड संदर्भात उभारण्यात येणारी रुग्णालये, केंद्रे यासह इतर नागरी प्रश्नांची माहिती एकनाथ शिंदे यांना शेवाळे यांनी दिली.

याबाबत शासनाने विशेष निधी देवून पनवेलचा विकास करावा. तसेच याकामी पालकमंत्र्यांना सुद्धा आवश्यक त्या सूचना कराव्यात, अशी मागणी सुद्धा शेवाळे यांनी केली आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनि. कॉलेज म्हसळा येथे शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनि. कॉलेज म्हसळा येथे शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने विद्यार्थ्यांच्या कल्पनेतून मूर्त स्वरूपात भित्तीपत्रकांच्या माध्यमातून छ. शिवाजी महाराजांचे संपूर्ण जीवन रेखाटले गेले होते. प्राचार्य प्रभाकर मोरे यांच्या हस्ते भित्ती पत्रकांचे अनावरण खुले करण्यात आले. प्राचार्य प्रभाकर मोरे यांनी सांगितले की छ. शिवाजी महाराज एक महापुरुष होते, त्यांची प्रेरणा प्रत्येकाने घेणे अत्यावश्यक त्यांच्या आदर्श प्रत्येकाने जपणे महत्वाचे आहे. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भाव लक्षात घेऊन प्रत्येकाने जबाबदारी पूर्वक सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्याची गरज असल्याचेही प्राचा. मोरे यांनी सांगितले. विद्यार्थांनी मराठी, हिंदी, आणि इंग्रजी भाषेत शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत लेख, कविता, चित्रारेखाटन केल्याने त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## PUBLIC NOTICE

Notice is given on behalf of my client **MR. VIPINDAS KAMMILI S/O RAGHUNATH KAMMILI** that My Client is Legal Owner of **Apartment No. KL-5/36/14, 3rd Floor, VISHWAVINAYAK APARTMENT OWNERS ASSOCIATION (Society Registration Certificate No. P-138/1987)Plot No. 3E/07 Sector-3E, Kalamboli, Navi Mumbai, Taluka-Panvel, Dist-Raigad 410218 Admeasuring Area- 33.21sq.mtr Built Up.** my client has sold abovementioned property to MR. GOVIND PARSHURAM CHAUHAN, AND **MRS. ISRAWATI DEVI W/O MR. GOVIND CHAUHAN** vide Document Registered No.Panvel-3-441-2021 on dated 08/01/2021

Room Related Document i.e. Original Allotment Letter of **KL-5/36/14, 3rd Floor, VISHWAVINAYAK APARTMENT OWNERS ASSOCIATION (Society Registration Certificate No. P-138/1987)Plot No. 3E/07 Sector- 3E, Kalamboli, Navi Mumbai, Taluka-Panvel, Dist- Raigad 410218 Admeasuring Area- 33.21sq.mtr Built Up.** has been lost/misplaced from My Client. My Client has given Property missing Complaint to the Kalamboli Police Station on dated 07/01/2021vide Register No. 0027/2021

Therefore any person(s) having any claim in respect of the above referred property or part thereof by way of sale, exchange, mortgage, charge, gift, maintenance, inheritance, possession, lease, tenancy, sub tenancy, lien, license, hypothecation, transfer of title or beneficial interest under any

trust right of prescription or pre-emption or under any Agreement or other disposition or under any decree, order or Award or otherwise claiming, howsoever, are hereby requested to make the same known in writing together with supporting documents to the undersigned within a period of 15 days by Registered Post . (both days inclusive)of the publication hereof failing which the claim of such person(s)will deemed to have, been waived and/or abandoned.

**Sd/-**
**Adv. Chaudhari& Associates**
**( Bombay High Court )**
**ADD – Shop No. 08, Krishna Tower,**
**Plot No. 12/13,Sector -5E, Near CIDCO**
**Kalamboli Office, Kalamboli,Taluka**
**Panvel, Dist Raigad 410218**

मा.पांडे साहेब कोर्ट
अर्जदाराचे वकील ॲड.अनिल जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.२३०/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२५/०३/२०२१

श्री.मन्सुर दादुमियॉ पटेल — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार श्री.मन्सुर दादुमियॉ पटेल यांचा दि.०१/०५/१९७५ रोजी मौजे : पाडा मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र येथे जन्म झाला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

श्री.मन्सुर दादुमियॉ पटेल यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणर नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून सदरहू श्री.मन्सुर दादुमियॉ पटेल यांचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२२/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

# हेटवणे- कळंबोली वॉटर ग्रीड अंतिम टप्प्यात आल्याने सिडको वसाहतीला मिळणार मुबलक पाणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हेटवणे धरणातुन सिडको वसाहतींना पाणीपुरवठा करण्याकरीता सिडकोने हाती घेतलेले हेटवणे-कळंबोली ग्रीडचे काम रखडले होते. गेल्या दहा वर्षापासून याकरीता अनेक अडथळे येत आहेत.त्यामुळे धरणात पाणी असुनही सिडको नोड तहानलेलच आहेत.सिडकोने सर्व तांत्रिक अडचणी दुर करून ही योजना मार्गी लावावी अशी मागणी शिवसेनेकडून करण्यात आली आहे. दरम्यान हे काम अंतिम टप्प्यात असून हमरापूर डोंगरातील टनेल सुद्धा एप्रिल पर्यंत पूर्ण होईल आता विश्वास सिडकोकडून व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे सिडको वसाहतीतील रहिवाशाचे तहान भागणार आहे.

हेटवणे धरणातील पाणी साठयापैकी सिडको प्रशासन तसेच सिंचन याकरीता पाणीविभाजन करार करण्यात आला. त्यामध्ये १००एमएलडी पाणी सिडकोला देणे अट ठेवण्यात आली होती. या करारनाम्यात बदलून होवून पाणी कोटा ५०ने वाढून तो दिडशे एमलडी करण्यात आला आहे. त्यामुळे या धरणात सिडकोकरीता आरक्षीत पाणी मोठया प्रमाणात असून त्याचा पूर्ण वापर होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

सिडकोने या ठिकाणाहून जलवाहिनी पुर्वीच टाकली आहे. तीची क्षमता अतिशय कमी आहे. त्यामुळे खारघरला आवश्यक पाणी सिडकोला देता येत नाही. त्याचबरोबर पंपिगची क्षमता सुध्दा अतिशय कमी आहे, या कारणाने कमी दाबाने पाणी मिळते. नियोजन शुन्य कारभारामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे हेटवणे- कळंबोली ग्रीडव्दारे इतर वसाहतींना पाणी देण्याचे नियोजन होते. डिसेंबर २०११ साली पूर्ण होणारा प्रकल्प झाला नाही. या पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम जवळपास पूर्णत्व आले आहे . हमरापूरच्या डोंगरात पाणी आणि त्याच्या अनुषंगाने बोगदा खोदण्याचे काम सुरू आहे दोन महिन्यात ते पूर्णत्वास येईल असा विश्वास सिडकोकडून व्यक्त करण्यात आला आहे. ते काम झाल्यानंतर कळंबोली, कामोठे नवीन पनवेलकरांन हक्काचे पाणी मिळेल. त्याचबरोबर खारघर नोडला सुद्धा पाणीपुरवठा करता येईल.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


अर्जदार तर्फे वकील
ॲड.दिनानाथ के.सोनकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.२१२/२०२१
ने.ता.३०/०३/२०२१

श्रीमती.अमिरुन मोहम्मद रफिक शेख — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा आबिद मोहम्मद रफिक शेख यांचा दि.०६/१०/२०१९ रोजी ग्रामीण रुग्णालय पनवेल, ता.पनवेल येथे मृत्यू झाला आहे. अर्जदार यांनी आपला मुलगा आबिद मोहम्मद रफिक शेख याच्या मृत्यूची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.पनवेल यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.आबिद मोहम्मद रफिक शेख ह्या वरील तारखेस व ठिकाणी मयत झाल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत त्याने या मे.न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात येईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.१८/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

मा.पांडे साहेब कोर्ट
अर्जदाराचे वकील ॲड.अनिल सुभाष जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.२२७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२५/०३/२०२१

श्रीमती.नजमा असीफ पटेल — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार कु.नजमुन्नीसा दादुमियॉ पटेल लग्नानंतरचे नाव श्रीमती.नजमा असीफ पटेल यांचा दि.०६/०६/१९७४ रोजी मौजे : पाडा मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र येथे जन्म झाला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

कु.नजमुन्नीसा दादुमियॉ पटेल लग्नानंतरचे नाव श्रीमती.नजमा असीफ पटेल यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणर नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून सदरहू कु.नजमुन्नीसा दादुमियॉ पटेल लग्नानंतरचे नाव श्रीमती.नजमा असीफ पटेल यांचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२२/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

मा.पांडे साहेब कोर्ट
अर्जदारतर्फे वकील
ॲड.निलम मुंगाजी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.२४५/२०२१
ने.ता.२५/०३/२०२१

श्री.विष्णू नामदेव भोईर
वय : ६२ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुपग्रामपंचायत उसर्ली खुर्द
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा कै.अनुसया नामदेव भोईर, यांचा मृत्यू दि.११/०६/२०१५ रोजी मु.डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी वयोवृद्ध असल्याकारणाने झालेला आहे. म्हणून अर्जदार श्री.विष्णू नामदेव भोईर यांनी कै.अनुसया नामदेव भोईर यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.अनुसया नामदेव भोईर यांचा वर नमूद ठिकाणी मृत्यू झाला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर जाहीर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी हरकती न दाखवल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२२/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

## चौघांविरुद्ध खारघर पोलिसांची कारवाई

आरोपींनी फिर्यादी यांना काम करण्यासाठी यावे म्हणुन फोनवरुन दमदाटी केली. तसेच फिर्यादी यांच्या पतीला फिर्यादी ह्या धंदा करतात अशी खोटी माहीती दिली. फिर्यादी यांचे पति याबाबत विचारणा करण्यासाठी स्पा जवळ आले असता दि. ११/०२/२०२१ रोजी फिर्यादी व त्यांच्या पत्नीस आरोपी स्मिता शिवदास, सरबजितसिंग़ उर्फ बिल्ला, राम चौहान व शाम चौहान यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तसेच राम चौहान व शाम चौहान यांनी फिर्यादी यांचा विनयभंग केला अशी तक्रार प्राप्त झाल्यावरुन खारघर पो. ठाणे गुन्हा रजि. क्र. ६२/२०२१ भादवि कलम ३७६, ३५४, ३२३, ५०६, ५०४, ३४ सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम कलम ३, ४, ५ प्रमाणे दाखल केला असुन गुन्ह्यात चार पुरुष आरोपीना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपायुक्त शिवराज पाटील झोन २ पनवेल व सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन भोसले पाटील पनवेल विभाग यांचे मार्गदर्शनानुसार वरीष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी व सहा पोलीस निरीक्षक हरीष कळसेकर हे पुढील तपास करीत आहेत.

सलुन च्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणारे विरूध्द नवी मुंबई त पहिल्यांदाच ईतकी मोठी धडक कारवाई खारघरचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी ह्यांनी केल्याने खारघरवासीकडुन त्याचे कौतुक होत आहे सलुन भाड्याने देतांना दुकान मालकांनी खात्री करूनच दुकान भाड्याने घ्यावे असे आवाहन खारघर पोलीस स्टेशन चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी ह्यांनी केले आहे.

## ३ रुपयांची भाडेवाढ

रिक्षा टॅक्सीच्या भाड्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असं सांगितलं. रिक्षाचे दरात तीन रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे आता रिक्षाच्या पहिल्या टप्प्याला १८ रुपयांऐवजी २१ रुपये मोजावे लागणार आहेत. त्यापुढील प्रत्येक किलोमीटरला १४.२० पैसे मोजावे लागणार आहेत. १ मार्च २०२१ पासून ही भाडेवाढ लागू होणार आहे. तसेच टॅक्सीच्या दरात २२ रुपयांऐवजी २५ रुपये मोजावे लागणार आहेत. पहिल्या टप्प्यानंतर त्यापुढील प्रत्येक किलोमीटरला १६ रुपये मोजावे लागणार आहेत. १ मार्च ते ३१ मेपर्यंत कार्डनुसार हे भाडे आकारता येणार आहे., अशी माहिती अनिल परब यांनी दिली.

१ मार्च ते ३१ मेपर्यंत कार्डनुसार भाडं आकारता येईल. त्यानंतर १ जूनपासून मीटरमध्ये बदल झाला पाहिजे. गेल्या ६ वर्षांपासून रिक्षा आणि टॅक्सीच्या दरा कोणत्याही प्रकारची भाडेवाढ करण्यात आली नव्हती. त्यामुळे भाडेवाढ करण्यात आली आहे., अशी माहिती परिवहनमंत्री अनिल परब यांनी दिली.

## सदैव सहकार्य करीत राहणार : आ.प्रशांत ठाकूर

वासुदेव घरत, नगरसेवक शत्रुघ्न काकडे, नगरसेवक संतोष भोईर, नगरसेवक विष्णू जोशी, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, महाराष्ट्र राज्य वाहतूक सेनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, साक्षी इन्टरप्रायझेसचे सतीश म्हात्रे, राजू चव्हाण, वलप सरपंच भोलानाथ पाटील, माजी सरपंच गोविंद गायकर, किरण दरे, दीपक बोन्डे, शिवसेनेचे तालुका प्रमुख एकनाथ म्हात्रे, तळोजा मजकूर माजी सरपंच संतोष पाटील, सुनील गोवारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे राजकुमार म्हात्रे आणि भाजपचे प्रभाग क्रमांक १ चे अध्यक्ष नंदकुमार म्हात्रे यांनी स्वागत केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## धामणसई येथे विठ्ठल - रुक्मिणी मंदिराचे प्रथम वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रामध्ये नावलौकिक असलेल्या सोनगाव – गावठाण – धामणसई पंचक्रोशीतील श्रीक्षेत्र धामणसई येथील श्री जय हनुमान मंदिरामध्ये प्रथम वर्षीय श्री विठ्ठल – रुक्मिणी मूर्ती प्राण प्रतिष्ठापणा दिनाचे औचित्य साधत एक दिवसीय नाम यज्ञ हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे..

माघ शुद्ध त्रयोदशी या पवित्र पावन तिथिवर गत वर्षी धामणसई येथे विठ्ठल – रुक्मिणी मूर्तींचे प्राण प्रतिष्ठापणा सोहोळा अध्यात्मिक व धार्मिक विधिपूर्वक स्वा.सु.नि. गुरुवर्य.अलिबागकर महाराज, स्वा.सु.नि.गुरुवर्य वै.गोपाळ बाबा वाजे महाराज, गुरुवर्य वै.धोंडू बाबा कोल्हटकर यांच्या कृपाशीर्वादाने गुरुवर्य हभप.सखाराम महाराज (भाऊ) निकम, रायगड भूषण पुरस्कार प्राप्त गुरुवर्य हभप.दळवी गुरुजी, हभप.गुरुवर्य मारुती महाराज कोल्हटकर,हभप. गुरुवर्य बाळाराम महाराज शेळके, हभप.गुरुवर्य नामदेव महाराज यादव, रायगड भूषण सा.भारती गुरुवर्य हभप. किरण महाराज कुंभार (पाली) यांच्या मार्गदर्शनाखाली याही वर्षी गुरुवार दिनांक २५ फेब्रुवारी माघ शुद्ध त्रयोदश एक दिवसीय नाम यज्ञ हरिनाम सप्ताहाचे निमित्ताने पहाटे ०४:०० वाजता काकड आरती, पहाटे ०५:०० वाजता श्री.विठ्ठल – रुक्मिणी श्रींची महापूजा, सकाळी ०७:००ते ०८:०० वाजता श्रींच्या मूर्तीवर महाअभिषेक,०९:०० ते ११:०० वाजेपर्यंत श्री.विठ्ठल रुक्मिणी दिंडी नगर प्रदक्षिणा तद्नंतर दुपारी १२:०० ते ०४:०० वाजेपर्यंत ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरीच्या ९ व्या आध्यायचे सामुदायिक पारायण, महाप्रसाद, ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरीच्या १२ व्या आध्यायचे सामुदायिक पारायण, सायंकाळी०४:३० वाजता प्रवचन रायगड भूषण गुरुवर्य हभप. दळवी गुरुजी(वांगणी),५:३० वा.सामुदायिक हरिपाठ भैरवीनाथ भजन मंडळ –धामणसई,०७:०० ते ०९ :०० रायगड भूषण हभप. किरण महाराज कुंभार (पाली) यांचे सुश्राव्य हरी कीर्तन सेवा, तद्नंतर सामुदायिक महा जागर ग्रामस्थ व महिला मंडळ – धामणसई आदी विविध धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# कोरोनातील विरंगुळा-अर्बन हाट

कोरोना महामारीचा फटका संपूर्ण जगाला लागलेला आहे. उद्योगधंद्यांच्या दृष्टीकोनातून २0२0 हे साल इतक वाईट साल असेल ही कल्पना देखील कोणी केली नसेल. या महामारीच्या प्रकोपामुळे लहान, सुक्ष्म उद्योग, हातमाग व्यापारी, खादी, हस्तकला उद्योगांचे प्रचंड नुकसान झाले आहे. आता कुठेतरी हळूहळू हे लहानसहान उद्योजक या आर्थिक मंदीतून वर येण्याचा प्रयत्न करत आहेत.कोरोना काळात महाराष्ट्रासह देशाच्या इतर राज्यातील लघुउद्योजकांना, कलाकरांना स्वबळावर पुन्हा नव्या उत्साहाने उभे राहण्याची संधी अर्बन हाटने उपलब्ध करुन दिली आहे. कोरोनामुळे आर्थिक व मानसिकरित्या नैराश्यात लोटलेल्या कलाकरांना, कारागिरांना अर्बन हाटने नवी उमेद दिली आहे.

२२ जानेवारी २010 रोजी मुंबई महानगरक्षेत्र विकास प्राधिकरणाने नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथे अर्बन हाट (कलाग्राम) नागरीकांसाठी खुले करुन दिले. दिल्ली येथील कलाग्रामच्या धर्तीवर हे कलाग्राम उभारण्यात आले आहे. सीबीडी रेल्वे स्थानका नजीक असलेले हे अर्बन हाट सुमारे ५ हेक्टरच्या विस्तीर्ण जागेत वसलेले आहे. नवी मुंबईतील संस्कृतीला या वास्तूमुळे एक आगळी वेगळी ओळख निर्माण झालेली आहे. २010 पासून आतापर्यंत विविध प्रकारचे एकूण १७0 मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. कोकण सरस सारख्या महामेळाव्यात कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर आणि सिधुदूर्ग मधील ग्रामीण भागातल्या महिलांना, बचतगटांना, कलाकरांना आपले उत्पादन विकण्याची संधी प्राप्त झाली. अर्बन हाटमुळे ग्रामीण भागातील लघुउद्योजक, शेतकरी, कारागिरांना अर्थार्जनासाठी बाजारपेठ व व्यासपीठ प्राप्त झाले आहे. देशाच्या विविध राज्यांतून येणाऱ्या कलाकार, कारागीरांना आपल्या कला, हस्तकला, तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन करण्याची संधी येथे उपलब्ध होते, तसेच कलेची जाण असलेले गर्दी प्रेक्षक वर्गाकडून त्या कलाकृती विकत घेतल्या जातात त्यामुळे कलाकरांना त्यांच्या कलेची योग्य किंमतही मिळते. नितांत सुंदर अशा वनपरिसरात हे अर्बन हाट तयार करण्यात आले आहे. फुला-फळांची विविध प्रकारची ४000 हून जास्त झाडे असलेला हा परिसर फिरतांना जंगल सफारी केल्याचा अनुभव मिळतो. विशेष म्हणजे झाडांना न कापता ही वास्तू उभारण्यात आली आहे. त्यामुळे याठिकणी नागरिकांना विविध प्रकारची खूप वर्षे जूनी झाडे पहायला मिळतात. अर्बन हाट मध्ये विविध राज्यातून येणाऱ्या कारागिरांनी निर्मिलेली तागाची उत्पादने, काष्ठ कला उत्पादने, गालिचे, कृत्रिम दागिने, सुगंधी उदबत्त्या, बांबूपासून तयार केलेल्या कलाकृती, कागदाच्या लगद्यापासून तयार केलेल्या कलात्मक वस्तू, चित्रे, मातीची भांडी, चामड्याची उत्पादने, ड्रेस मटेरिअल, साड्या, एम्ब्रॉयडरी, पिशव्या, पादत्राणे, कॉटन ब्लॉक प्रिंट आणि कलाकुसरीच्या अन्य वस्तू प्रदर्शनार्थ तसेच विक्रीसाठी एकूण ६0 दालने (गाळे) माफक दरात उपलब्ध आहेत. अर्बन हाटमुळे नवी मुंबईकरांना एकाच छताखाली पारंपरिक व आधुनिक उत्पादने उपलब्ध झाली आहेत.

टाळेबंदीनंतरची अनलॉक प्रक्रिया सुरू झाल्यापासून, अर्बन हाट येथे नोव्हेंबर २०२१ पासून दर महिन्याला महोत्सवाचे आयोजन करून कारागीर आणि कलाकारांना अर्थार्जनाची संधी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. नोव्हेंबर २०२० ते जानेवारी २०२१ दरम्यान हॅन्डीक्राफ्ट, शिल्पमेळा, संक्रांतमेळा आणि वसंतमेळा असे ४ महोत्सवांचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यांमध्ये ४00 हून अधिक कलाकार, कारागीरांनी आपल्या कला, हस्तकालांचे प्रदर्शन केले तसेच ४ हजार पेक्षा जास्त नागरिक, कलाप्रेमींनी अर्बन हाटला भेटी दिल्या. अर्बन हाट परिसर स्वच्छ आणि आरोग्यपूर्ण असल्याने याची आयोजकांतर्फे पुरेपूर काळजी घेण्यात आली आहे. अर्बन हाटचा परिसर खुला असल्याने तसेच तेथे उभारण्यात येणारे स्टॉल आकाराने मोठे असल्याने शासनाने ठरवून दिलेल्या सामाजिक अंतराच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे. मेळाव्यात येणाऱ्या नागरिकांना मास्कचा वापर करणे बंधनकारक आहे. तसेच प्रवेशद्वारावरच थर्मल स्कॅनिंग व सॅनिटायझर किंवा हॅन्ड वॉशने निर्जुंतुकीकरण केल्यानंतरच आतमध्ये प्रवेश देण्यात येतो.

अर्बन हाट मध्ये तयार करण्यात आलेल्या बटरफ्लाय गार्डन मध्ये तब्बल २८ पेक्षा जास्त प्रजातीची फुलपाखरे पहायला मिळतात. नैसर्गिक सौंदर्य आणि विविध प्रजातीच्या पक्ष्यांच्या किलबीलाटाने हा परिसर प्रसन्नमय वाटतो. आपल्याला विविध पक्ष्यांचे आवाज ऐकायला आवडतात. मात्र शहरी भागात आपल्याला हा अनुभव घेता येत नाही. परंतु अर्बन हाट मधील भौगोलीक रचना व सिडको मार्फत जतन करण्यात आलेल्या नैसर्गिक संपत्तीमुळे ही अनुभूती आपल्याला घेता येते.

अर्बन हाट हे शालेय तसेच महाविद्यलयीन विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सहलीचे (स्टडीटूर) ठिकाण बनले आहे. आतापर्यंत भारतातील सुमारे २५ आर्कीटेक्ट कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी या अर्बन हाटला भेट दिलेली आहे. येथील निसर्गरम्य शांत परिसरामुळे युपीएससी, एमपीएससीचे विद्यार्थी अभ्यासासाठी या ठिकाणी येत असतात. २010 पासून अर्बन हाट मध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पंडित हरिप्रसाद चौरसिया (बासरीवादक), जगजितसिंग आणि पंडित जसराज या प्रख्यात संगीतकारांनी शहरी हॅटमध्ये संगीताचे कार्यक्रम सादर केले. त्याचप्रमाणे जॅकी श्रॉफ, जॉनी लीव्हर, मराठी, बंगाली, केरळ, चित्रपट दिग्दर्शक, अभिनेते आणि अभिनेत्री अशा चित्रपट जगातील ख्यातनाम कलाकारांनी अनेक कार्यक्रमात भाग घेतला. मुंबई-नवी मुंबईच्या शाळा व महाविद्यालयांनी अर्बनहाट मध्ये उपलब्ध म्पीथिएटरमध्ये वार्षिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. डी वाय. पाटील कॉलेज, सत्याग्रह महाविद्यालय, हार्मनी स्कूल, रोटरी क्लब, लायन्स क्लब यांच्या वतीने म्पीथिएटरमध्ये अनेक नृत्य आणि नाटक कार्यक्रम आयोजित केले आहेत. बंगाली संघटना, मल्याळी संघटना, आसाम कल्चरल क्लब आणि गुजराती सांस्कृतिक क्लब यांनी या ॲम्फीथिएटरमध्ये विशेष कखकली, भरतनाट्यम, कथकली, मोहिनीअट्टम, कुचीपुडी, लावणी आणि गरबा नृत्य आयोजित केले आहेत. छत्रब्ज या स्वयंसेवी संस्थेच्या आणि नवी मुंबईच्या संघटनांच्या व्यतिरिक्त नाटक महोत्सव माइंडस्केप कार्यशाळा व चर्चासत्राचे आयोजन, चित्रकला स्पर्धा, चित्रपट महोत्सव, शहरी हॅटमध्ये ऑर्केस्ट्रा आयोजित करण्यात आले होते.कोरोनाच्या आधी आणि कोरोना नंतर काही जास्तच प्रमाणात ऑनलाईन शॉपिंगचे प्रमाण वाढले आहे.ग्राहकांना आपल्या आवडी निवडी प्रमाणे घरी बसल्या बसल्या वस्तू खरेदी कराता येतात.फ्लीपकार्ट, मॅझोन, मिन्त्रा सारख्या विविध नामांकित कंपन्या ऑनलाईन पध्दतीने वस्तूंची विक्री करतात.यामध्ये ग्राहकांना जितके सोप्यापध्दतीने घरीबसल्या वस्तू खरेदी करता येतात तितकाच ऑनलाईन व्यवहारात धोकाही पत्करावा लागतो.ऑनलाईन शॉपिंग मधून होणाऱ्या फसवणूकीच्या बातम्या रोज ऐकायला व पहायला मिळतात.ऑनलाईन शॉपिंगमुळे शासनामार्फत भरवण्यात येणाऱ्या अशा मेळाव्यांकडे नागरीकांचा कानाडोळा होत आहे.त्यामुळे अशा मेळाव्यांना हवा तेवढा प्रतिसाद मिळत नाही.बरेच वेळा काही वस्तू ऑनलाईन मिळत नाही अशा दूर्मिळ, चांगल्या दर्जाच्या वस्तू फक्त या मेळाव्यांमध्येच बघायला मिळतात.नागरिकांनी अशा मेळाव्यांना भेट देऊन इथल्या वस्तू खरेदी केल्यास ग्रामीण भागातील हस्तकलाकार, कारागिर, लघुउद्योजक, बचतगटांना आर्थिकदृष्ट्या प्रबळ करण्यास मदत होईल व त्यांचे मनोबल वाढेल. अर्बन हाट हे केवळ मर्यादीत क्षेत्रातील विभागांसाठी नसून महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांच्या प्रदर्शन, उत्पादन विक्रीसाठी खुले आहे.संपूर्ण अर्बन हाट चे एका दिवसाचे भाडे ४0000/- आहे.यात ६0 पेक्षा जास्त गाळे, थिएटर, सुरक्षेच्या दृष्टीने सर्व कर व सेवा सुविधांचा समावेश आहे. प्रशासनाच्या अथक प्रयत्नांतून आटोक्यात आलेला कोरोना आता पुन्हा डोकं वर काढत आहे. वाढत्या कोरोनाला वेळीच अटकाव करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या सूचनांचे नागरिकांनी काटेकोरपणे पालन करावे. सद्या कोरोना बाधितांची वाढती संख्या लक्षात घेता अर्बन हाटमध्ये आयोजित करण्यात आलेले मेळावे पुढे ढकलण्यात आले आहेत.

**प्रविण डोंगरदिवे**
**माहिती सहाय्यक**
**विभागीय माहिती कार्यालय**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

# साईमध्ये बहुजन क्रांती मोर्चातर्फे शिवजयंती साजरी

**दै.रायगड नगरी । माणगाव**



साईमधील ॲड.हारुन सोलकर हायस्कूल मध्ये बहुजन क्रांती मोर्चा तर्फे कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली असून कार्यक्रमाचे उद्घाटन साई ग्रामपंचायतीचे सरपंच हुसेन ईस्माइल रहाटविलकर यांच्या हस्ते करण्यात आले.

सदर कार्यक्रम प्रसंगी साई सरपंच हुसेन राहाटविलकर, राष्ट्रीय प्रभारी बहुजन क्रांती मोर्चा (नवी दिल्ली ) कुमार काळे, माणगांव पंचायत समितीचे माजी सभापती सुजित शिंदे, माजी सभापती गजानन अधिकारी, जमातुल मुस्लिमीन साई अध्यक्ष इब्राहीम जुवले, साई मराठा समाज अध्यक्ष गोविंद अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना रायगड जिल्हा अध्यक्ष लियाकत राऊत, माणगाव बौद्ध पं.स. उपाध्यक्ष विठोबा मोरे, खैरेवाडी अध्यक्ष प्रकाश धुमाळ, साई ग्रामपंचायत माजी उपसरपंच आनिस सोलकर, रायगड राष्ट्रीय किसान मोर्चा संयोजक गफार रहाटविलकर, साई आदिवासी समाजाचे अध्यक्ष भारत जाधव , राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा माणगांवअध्यक्ष रिदवान जलगावकर, सैफुल्ला जलगावकर, गणेश पवार, प्रशांत अधिकारी, प्रवीण अधिकारी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

माणगाव पंचायत समिती माजी सभापती सुजित शिंदे, गजानन अधिकारी, यांनी शिवरायांनी जाती भेद न करिता सर्व जातीधर्माचे लोक एकत्रित करुन स्वराज्याची स्थापना केली. त्यांच्या सभासदांमध्ये ३५ टक्के मुस्लिम बांधवांचा सहभाग होता. शिवरायांच्या निकटवर्तीयांमध्ये मुस्लिम बांधव जास्त जवळ होते. परंतु आपल्या सर्वसामान्य जनतेमध्ये हिंदू – मुस्लिम हे वेगवेगळे आहेत ही भावना त्यावेळी जागृत करीत मनामध्ये मतभेद निर्माण केला. अशा वेगवेगळ्या विषयावर त्यांनी मत पटवून शिवरायांच्या जयंती निमित्त दिले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड. जयेश पवार, कासे सर, राकेश मोरे, अब्रार सोलकर, राम सावंत, मिलिंद साळवी व विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते यांनी मेहनत घेतली.

श्री.भाकरे सो.कोर्ट

प्रोसेस जमा रु.५०/- ॲड.समाधान काशिद, कामोठे
अर्जदारतर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात, पनवेल

दि.चौ.अर्ज क्रं.८६०/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२४/०३/२०२१

श्रीमती.बाळुताई दिलीप सुळे आणि इतर — अर्जदार
विरुद्ध
कलावती ज्ञानदेव सुळे — सामनेवाले

ज्याअर्थी कै.दिलीप ज्ञानदेव सुळे हे दिनांक २१/०५/२०१९ रोजी एमपीसीटी हॉस्पिटल, सेक्टर नं.४, सानपाडा येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाचे खाते आहे.

**वर्णन**

**सारस्वत को.ऑप.बँक लि. शाखा-विक्रोळी येथे खाते क्रं.१२४२००१०००४७०२८ एकूण रक्कम रुपये ४१,४१,१०४/- एवढी रक्कम कै.दिलीप ज्ञानदेव सुळे यांचे खातेवर आहे.**

कै.दिलीप ज्ञानदेव सुळे यांस अर्जदार व प्रतिवादी हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार यांनी उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावा म्हणून अर्ज केला आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा उत्तराधिकार प्रमाणपत्र अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार व सामनेवाले यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला मयताचे वरील वर्णन केलेल्या बँक खात्यातील रक्कम मिळण्यास वारस म्हणून उत्तराधिकार प्रमाणपत्र दिले जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

तारीख २९/१/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.बहिर साहेब

अर्जदारतर्फे वकील
ॲड.सुजाता पाटील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.८९७/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०३/२०२१

श्रीमती.अर्चना संतोष पारखे व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार नं.१ यांचे पती तसेच अ.नं.२ ते ४ यांचे वडील कै.श्री.संतोष निवृत्ती पारखे हे दि.१५/०८/२०१९ रोजी सुश्रुषा हॉस्पिटल, मुंबई येथे मयत झाले. मयत कै.श्री.संतोष निवृत्ती पारखे यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

कै.श्री.संतोष निवृत्ती पारखे यांचे नावे असलेल्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे

**मधुकूंज सोसायटी, प्लॉट नं.सी.३२,**
**सब प्लॉट रुम नं.0४, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई ४१0२१0**
**तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड क्षेत्रफळ २८ चौ.मी.कारपेट**
**मालमत्ता मुल्यांकन : रुपये १0,५0,000/-**
**(रुपये दहा लाख पन्नास हजार मात्र)**
**५0 टक्के भाग : रुपये ५,२५,000/-**
**(रुपये पाच लाख पंचवीस हजार मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१६/२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# पालीत लहानग्या शाहिरांच्या पोवाड्यांनी झाले सारे मंत्रमुग्ध

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

शिवऋण प्रतिष्ठान महाराष्ट्र, तहसील कार्यालय व नगरपंचायत पाली यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंतीनिमित्त येथील मराठा समाज सभागृहात शिवगीत व पोवाड्यांचे कार्यक्रम झाले. तसेच विविध क्षेत्रातील कोरोना योद्धांचा सन्मान देखील करण्यात आला. रोम रोम उत्साहित करणारे व अंगावर शहारे आणणारे दमदार पोवाडे यावेळी सादर झाले.

यावेळी लहान शाहिरांनी पहाडी आवाजात शिवाजी महाराजांवर पोवाडे सादर केले. शाहीर अमोल, हर्षल भांडकोळी, लहानगा स्वराज नंदिनी नरेश मोरे, आर्यन राबसाहेब जाधव याच्यासह अनेक लहान व तरुण शाहीरांनी आपली कला सादर केली. या अदाकारीने उपस्थित सर्वचजण मंत्रमुग्ध झाले होते. या कार्यक्रमास तहसीलदार दिलीप रायन्नावार, शिवऋण प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल मोरे व उपाध्यक्ष केतन म्हसके, अनुपम कुलकर्णी, आरिफ मणियार, विनय मराठे, डॉ. जयंत जाधव, सुनील राऊत, डॉ. नंदकुमार मुळे, रोहन दगडे, शरद चोरघे व विकास चित्ते आदींसह मान्यवर उपस्थित होते.

मे.मुजावर साहेब

ॲड.एस.जी.पाटकर
वादीचे वकील

## दावा समन्स

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

स्पे.मु.नं.४६४/०७
नि.नं.५८/ड
ने.ता.२५/३/२०२१

स्टेट बँक ऑफ इंडिया — वादी
विरुद्ध
श्री.नंदकुमार घाडगे आणि वगैरे — प्रतिवादी

प्रति,

१) श्री.नंदकुमार पांडुरंग घाडे
रा.अ विंग, फ्लॅट नं.२०१,
बी बिल्डींग, से.६, कामोठे,
नवीमुंबई

२) श्री.शामसुंदर बलदेवचंद शर्मा
रा.९६ टाईप ३, बिल्डींग नं.५,
रुम नं.२१२०, आर.सी.एफ.
कॉलनी, मुंबई ४०००७४

३) मे.साई द्वारका एन्टरप्राईजेस तर्फे भागीदार
ऑफिस : साई दिप, प्लॉट नं.७४ आणि ८५,
से.१०, नवीन पनवेल-४१०२०६

४) श्री.किशोर ठाकूर
ऑफिस : साई दिप प्लॉट नं.७४
व ८५, सेक्टर १०,
नवीन पनवेल-४१०२०६

५) श्री.लालजी दयाहा चौहान
ब्लॉक बी/३०१, गुलमोहर
अपार्टमेंट, प्लॉट नं.१४६,१४७,
१४८, से.१०, नवीन पनवेल

ज्याअर्थी वादी स्टेट बँक ऑफ इंडिया, पनवेल शाखा, यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात कर्जाचे रक्कमेची वसूली बाबत वाद दाखल केला आहे. म्हणून त्या संबंधात आपले म्हणणे मांडण्याकरिता दि.२५/०३/२०२१ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास यथायोग्य सुचना दिलेल्या असून जो दाव्यासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकणारी व्यक्ती त्यांच्याबरोबर असेल अशा वकीलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलाविण्यात येत आहे व तुमच्या बचावाच्या पुष्ट्यार्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीचा व ज्या दस्तऐवजांचा आधार घेवू इच्छिता ते सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादीची सुनावणी होवून निकाल दिला जाईल याची दक्षता घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास, तुमचा जबाब रद्द होण्यास पात्र ठरेल.

आज दि.२२ माहे २/२०२१ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# रावसाहेब गोळे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या अनेक वर्षांपासून मुरुड तालुक्यात लोकप्रिय असलेले कासार (रामदास मामा) ऊर्फ कै. रावसाहेब सिताराम गोळे यांचे शनिवार दि.२० फेब्रुवारी २०२१ रोजी त्यांच्या मुळ गावी वयाच्या ७८ व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली,जावई,सुना व नातवंडे असा परिवार आहे.

राव साहेब

ॲड.अरविंद चामले
ॲड.शुभांगी पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो,
पनवेल यांचे न्यायालयात

चौ.अर्ज क्र.२२९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३१/३/२०२१

१) श्रीमती.स्मिता नरेश कोळी
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.सायली नरेश कोळी
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.श्वेता नरेश कोळी
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
४) कु.साहिल नरेश कोळी
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
५) कु.स्नेहा नरेश कोळी
वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण
अ.क्र.४ व ५ तर्फे अज्ञानपालनकर्ती
अ.क्र.१ आई
सर्व रा.ओवे पेठ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदर प्रस्तुत अर्जदार नं.१ यांचे पती २ ते ५ यांचे वडील कै.नरेश पदू कोळी, हे दिनांक १९/०४/२०२० रोजी मृत्यू पावले आहेत. त्यांचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण मौजे : ओवे पेठ, ता.पनवेल, जि.रायगड असून ते येथील कायमचे रहिवाशी होते. त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावावर खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील**
**१) मौजे : ओवे पेठ, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील घर नं.१६६/ड**
**२) मौजे : ओवे पेठ, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील घर नं.१६६/अ/३ मधील गाळा नं.३**

व त्यांना पुढीलप्रमाणे वारसदार होते व आहेत.

| क्रं. | वारसदाराचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | स्मिता नरेश कोळी | ४० | पत्नी |
| २ | सायली नरेश कोळी | २० | मुलगी |
| ३ | श्वेता नरेश कोळी | १८ | मुलगी |
| ४ | सहिल नरेश कोळी | १७ | मुलगा |
| ५ | स्नेहा नरेश कोळी | १५ | मुलगी |

वरील प्रमाणे सदर प्रस्तुत अर्जदार नं.१ यांचे पती २ ते ५ यांचे वडील कै.नरेश पदू कोळी यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.२२/०२/२०२१ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## महिलेच्या गळ्यातील दागिने खेचून पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पायी जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने खेचून मोटार सायकलवरून दोन अज्ञात इसम पसार झाल्याची घटना पडघे गावाच्या हद्दीत घडली आहे.

सिताबाई दत्तू जोशी (५२) या नातीच्या लग्नाचा कार्यक्रम संपवून चालत घरी जात असताना एका मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींपैकी मागे बसलेल्या व्यक्तीने हाताने त्यांच्या गळ्यात असलेली ४० हजार रुपयाची गंठण खेचून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## साबळे विद्यालयात तुलसीयानी संगणक कक्षाचे उदघाटन संपन्न

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे अशोकदादा साबळे विद्यालय व माणगांव ज्युनियर कॉलेज माणगांव रायगड या ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यालयास निसर्ग चक्री वादळामुळे संगणकाचे नुकसान झाल्याने सुमन रमेश तुलसीयानी ट्रस्ट मुंबई यांचे कडुन समाजसेवक कृष्णा महाडिक यांच्या सहकार्याने संगणकासाठी रुपये पाचलाख मदत मिळाली होती. या मदतीतून संस्थेने नविन पंधरा संगणक खरेदी केले या संगणक कक्षाचे उदघाटन, दिनांक २० फेब्रुवारी रोजी दुपारी १२. ४५ वाजता तुलसीयानी ट्रस्ट मुंबईचे व्यवस्थापक मनिषभाई यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड. राजीव साबळे, समाजसेवक कृष्णा महाडिक, संस्थेचे सचिव कृष्णा गांधी, स्कुल कमिटी चेअरमन राजन मेथा, संस्था पदाधिकारी नरेंद्र गायकवाड व नितीन बामगुडे उपस्थित होते.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य टी. जे. ढमाळे यांनी केले तर संस्थेचे अध्यक्ष ड. राजीव साबळे यांनी संस्था कार्याचा आढावा आपल्या मनोगतातून घेतला. यावेळी तुलसीयानी ट्रस्टचे व्यवस्थापक मनिषभाई यांनी आपल्या मनोगतातून शिक्षण व आरोग्यासाठी आमचा ट्रस्ट सढळहस्ते मदत करतो, असे आवर्जुन सांगितले आहे. या कार्यक्रमासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य राजकुमार जगताप व उपप्राचार्य टी. जे. ढमाळ तसेच उसर हायस्कुलचे शिक्षक लाड व साईचे शिक्षक प्रकाश धुमाळ तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डि. एस. उभारे यांनी केले

# स्थानिकांना विश्वास : माथेरान मिनिट्रेनच्या खाजगीकरणामुळे पर्यटन क्रांती घडणार !

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरान मिनिट्रेनच्या सेवेबाबतीत रेल्वे प्रशासनाचा नेहमीच नकारात्मक दृष्टिकोन पहावयास मिळत असल्याने ह्या सेवेचा लाभ पर्यटकांना कधीच मनमुरादपणे घेता आला नाही. नेहमीच काहिनाकाही तांत्रिक कारण पुढे करून नेरळ माथेरान ही सेवा जवळजवळ बंदच करण्यात आली आहे. माथेरान करांसह पर्यटकांची सुद्धा ही ट्रेन जीवनवाहिनी बनलेली असतांना आजवर या ट्रेनच्या सफरीसाठी देशविदेशातील पर्यटक भेट देत असतात परंतु नेरळ माथेरान सेवा बंद असल्याने सर्वांचा हिरमोड होत आहे. अमन लॉज ते माथेरान दरम्यान या ट्रेनची शटल सेवा उपलब्ध असल्यामुळे तरी माथेरानच्या पर्यटनामध्ये जान आलेली आहे अन्यथा एक भकास पर्यटनस्थळ म्हणून याची ओळख निर्माण झाली असती. स्थानिकांच्या पाठपुराव्यामुळे आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रयत्नांमुळे निदान शटल सेवा सुरू आहे त्यामुळेच इथल्या स्थानिकांसह तालुक्यातील जवळपास पंचवीस हजार लोकांना रोजगार उपलब्ध होत आहे. नेरळ, कर्जत त्याचप्रमाणे आजूबाजूच्या परिसरातील लोकांना केवळ माथेरानच्या पर्यटनावर अवलंबून राहावे लागत आहे.

नेरळ माथेरान मिनिट्रेन सेवा बंद असल्यामुळे नाईलाजाने पर्यटकांना खाजगी वाहनाने अव्वाच्या सव्वा रक्कम मोजून हा घाटरस्त्याचा सात किलोमीटरचा प्रवास करावा लागत आहे.नेरळ माथेरान अशीच मिनिट्रेन सेवा सुरू झाल्यास सर्वानाच फायदेशीर ठरणार आहे. येणारे पर्यटक हे खासकरून मिनिट्रेनच्या सफरीसाठी येत असतात. ऐन गर्दीच्या वेळी तिकीट उपलब्ध न झाल्यास खाजगी वाहनाने प्रवास करू शकतात त्यामुळे खाजगी वाहन चालकांना सुध्दा रोजगार उपलब्ध होऊ शकतो.असे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

> खाजगीकरणामुळे उत्तम दर्जाची सेवा पर्यटकांना भेटेल, देशातील चार पर्यटन स्थळी चालणाऱ्या ह्या मिनी ट्रेन तोट्या मद्धे चालत आहेत त्याचा मोठा फटका रेल्वे प्रशासनाला सोसावा लागत आहे, आणि त्या मुळे सरकार ह्या ट्रेन भविष्यात बंद करू शकते, आपले आर्थिक गणित पर्यटनावर अवलंबून आहे आणि या पर्यटनाचा खरा कणा माथेरान ची मिनी ट्रेन आहे, ही बंद झाली तर आपल्याला मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते,केंद्र शासनाने घेतलेला निर्णय योग्यच आहे, आपली माथेरान ची मिनी ट्रेन अविरत चालू राहून पर्यटकांना, आपल्याला उत्तम दर्जाची सेवा मिळेल, वाहतुकीचा प्रश्न ही या मुळे सोडवण्यास मदत होईल, रेल्वे ला माथेरानच्या ट्रेन मूळे दर वर्षी ८० कोटींच नुकसान होते, अंदाजे १०० कोटी चा खर्च होतो तर पर्यटनाच्या माध्यमातून रेल्वेच्या तिजोरीत २० कोटी जमा होतात एवढ्या मोठा तोटा रेल्वे प्रशासनाला होऊन सुद्धा प्रशासन रेल्वे सेवा देत आहे, सरकार ने खासगीकरणाचा निर्णय घेतला आहे,पर्यटकांना अधिक अधिक सुख सोई मिळतील व आपल्याला चांगला रोजगार प्राप्त होईल.
>
> **प्रेरणा प्रसाद सावंत, नगराध्यक्षा माथेरान नगरपरिषद**

## बोर्ली-म्हसळा मार्गावर मोटार सायकलला अपघात १ ठार १ जखमी

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बोर्ली पंचतन- म्हसळा मार्गावर आज (रविवार) सकाळी १० च्या सुमारास काळसुरी गावाकडून शिस्ते कडे येणारी मोटार सायकल दिवेआगर हुन पुण्याकडे निघालेल्या कार यामध्ये झालेल्या अपघातामध्ये मोटार सायकल वरील १५ वर्षीय मुलगा जागीच गतप्राण झाला असून एक गंभीर जखमी झाला आहे



काळसुरी गावातील श्रवण सुनील नात्ती हा १५ वर्षांचा मुलगा आपल्या शिस्ते गावातील मुंबई हुन आलेल्या लाडक्या मावशीला मासे देण्यासाठी त्याचा वर्गमित्र स्वरूप निवळकर याच्या समवेत बजाज डिस्कव्हर कंपनीची मोटारसायकल क्रमांक एम एच ४६ एम १३५० घेऊन निघाला होता, दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील म्हसळा तालुक्यातील खानलोशी गावच्या हद्दीमध्ये एका वळणावर मोटारसायकल चालविणाऱ्या स्वरूप निवळकर याला ताब्यातील मोटारसायकल व त्याचवेळी दिवेआगर येथून पुण्याकडे निघालेल्या मोटार कार क्रमांक एम एच १२ एम आर ७०७० या गाडीचा अपघात झाला , दोन गाड्यांची धडक एवढी जोरात होती की मोटारसायकल वर मागे बसलेला श्रवण नात्ती हा जागीच गतप्राण झाला तर स्वरूप निवळकर याला जबर मार बसल्याने त्याला पुढील उपचारासाठी माणगाव येथे तातडीने हलविण्यात आले आहे. यामध्ये मोटार अपघात दाखल करण्यात आले असून मोटार कार चालक यांचे वर भादवी कलम ३०४, ३०४ अ, २७९, ३३७, ३३८ मोटार वाहन कायदा १८४ अनवये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर याबाबत अधिक तपास दिघीवसागरी पोलीस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक महेंद्र शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार के एन जागडे हे करीत आहेत

दिघी पोर्ट विकसीत होत असल्याने म्हसळा -वडवली- दिघी हा रस्ता सध्या नव्याने तयार करण्यात आला असून सध्या या मार्गावर चालणारी वाहने त्यामुळे भरधाव वेगाने चालत आहेत यामध्ये दहावी वर्गामध्ये शिकत असलेल्या श्रवण नात्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे आपल्या लाडक्या मावशीचे पुढील १५ दिवसांत शिस्ते गावामध्ये लग्न होणार आहे यासाठी मुंबईहून शिस्ते गावात आजच रविवारी येणाऱ्या मावशीसाठी मासे घेऊन जाणाऱ्या श्रवण वर काळाने घाला घातला यामध्ये शिस्ते व काळसुरी गावासहित परिसरात शोक व्यक्त करण्यात येत आहे.

## मास्क वापरा अन्यथा दंडाला सामोरे जा! तळा नगरपंचायतीचा आदेश

**दै.रायगड नगरी । तळा**

राज्यात कोरोना विषाणूच्या पुन्हा वाढत चाललेल्या प्रादुर्भावामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यात सर्वत्र मास्क वापरणे अनिवार्य करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

त्या अनुषंगाने तळा नगरपंचायतीने तळा शहरात सर्व नागरिकांना मास्क वापरणे सक्तीचे केले आहे. त्यासाठी नगरपंचायतीमार्फत तळा शहरात माईकद्वारे सूचना देण्यात येत आहेत. ज्यामध्ये सर्व नागरिकांनी मास्क लावणे अनिवार्य आहे. जे नागरिक विनामास्क फिरताना आढळतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. विनामास्क फिरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ५०० रु. दंडाला सामोरे जावे लागणार आहे.

तळा नगरपंचायत कार्यालयात तहसीलदार ए. एम. कनशेट्टी, पोलीस निरीक्षक एस. गेंगजे, प्रभारी मुख्याधिकारी खेडेकर यांनी कोरोनाबाबत उपाययोजना करण्यासाठी घेतलेल्या बैठकीत हॉटेल, पान टपरी, रेस्टॉरंट, मिनिडोअर, रिक्षा, शौचालय तसेच सार्वजनिक ठिकाणी मास्क वापरणे, सॅनिटाइझर फवारणी करणे अनिवार्य आहे.

तसेच आशा ठिकाणी गर्दी करणे टाळावे असे आवाहन देखील प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्यामुळे तळावासियांना आता कोरोनाला रोखण्यासाठी मास्क वा-परणे गरजेचे आहे अन्यथा दंडाला सामोरे जावे लागणार आहे.



## पोलादपूर-हळदुळेतील लाकडी घराने घेतला पेट



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील लहुळसे गावातील एका लाकडी घराला शॉर्ट सर्किटमुळे आग लागून संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

हळदुळे गावातील सीताराम भागोजी रिंगे, कोंडीराम रिंगे, भिकू रिंगे, पांडुरंग रिंगे, मुंताबाई रिंगे असे एकत्रित राहणारे ७ खोल्यांचे लाकडी घर रविवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास अचानक सर्व्हीस केबलने मेनस्वीचजवळ ठिणग्या उडून पेट घेतला. यामुळे संपूर्ण घराने पेट घेतला. यादरम्यान, स्थानिक ग्रामस्थांनी आगीपासून घर वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, तरही निमुळते रस्ते आणि पाण्याअभावी आग विझवणे अशक्य दिसून आले. पोलादपूर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांनी तातडीने आगीच्या घटनास्थळी धाव घेऊन सर्व परिस्थिती आटोक्यात आणली.

महाड औद्योगिक वसाहतीमधील अग्निशमन यंत्रणा आणि महाड नगरपालिका अग्निशमन यंत्रणांनी आग विझविण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले.

पोलादपूर महसूल विभागाने तातडीने नुकसानीचा पंचनामा केला तर महावितरणने परिसरातील घरे आणि इमारतींना दिलेल्या विद्युतपुरवठ्याची तपासणी केली.

## अशोकनगर किल्ला येथे स्वखर्चाने बांधलेल्या बसथांब्याचे लोकार्पण सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहे-कोलाड मार्गावर वसलेल्या अशोकनगर किल्ला येथे सामाजिक कार्यकर्ते तथा प्रतिष्ठित नागरिक विष्णू लोखंडे आणि परिवार यांनी स्वखर्चाने बांधलेल्या बसथांब्याचे लोकार्पण सोहळा शिवजयंती सोहळ्याचे औचित्य साधून मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

अशोकनगर किल्ला येथील ग्रामस्थांनी रोहे-कोलाड मार्गावरील आपल्या गावच्या हद्दीत रस्त्याला लागून बसथाब्याची नितांत गरज असल्याचे सामाजिक कार्यकर्ते तथा जेष्ठ नेते विष्णू लोखंडे यांना सांगितले असता श्री. विष्णू लोखंडे यांनीही क्षणाचा विलंब न लावता व ग्रामस्थांची गरज लक्षात घेऊन त्वरीत आपले स्व.तुकाराम वडील लोखंडे यांच्या स्मरणार्थ सदरचे बसथांब्याचे बांधकाम स्वखर्चाने पुर्ण करून दिले. रोहा डेपो वाहतूक निरिक्षक शंकर खानापूरकर, यांच्या शुभहस्ते या बस थांब्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपसरपंच दीपक जमदाडे, महादेव लोखंडे, प्रणिल लोखंडे, अशोकनगर ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष संदीप पालकर, अशोक चांदोरकर, जितेंद्र पालखर, श्री.विष्णू सेवाभावी संस्था अध्यक्ष अक्षय जाधव, नृत्य दिग्दर्शक शैलेश साळुंखे आदी मान्यवर उपस्थित होते.

अशोकनगर ग्रामस्थांना अशाप्रकारचे बसथांब्याची नितांत गरज होती ती गरज लोखंडे परिवाराचे माध्यमातून पुर्ण झाल्याने ग्रामस्थांनी लोखंडे परिवारास धन्यवाद दिले आहेत.

## महेंद्र घरत यांच्या कर्तृत्वाचा गावोगावी सन्मान

**दै.रायगड नगरी । उरण**

कामगार क्षेत्राबरोबरच, राजकीय, शैक्षणिक, व सामाजीक क्षेत्रात मागील ३५ वर्ष काम करत असतांना कुटुंबाप्रमुखाची जबाबदारी सुद्धा पार पाडतांना आपल्या कुटुंबाच्या संपत्तीतील समान एक हिस्सा आपल्या मुलीला देवुन बहूजन समाजापूढे, विशेषत : आगरी समाजापूढे एक नवा आदर्श ठेवणारे कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांना त्यांनी कोरोना काळात जणसामान्यांसाठी केलेल्या कामाचा सन्मान म्हणून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत व राष्ट्रवादीचे सर्वे सर्वा शरदचंद्र पवार यांच्या हस्ते प्रतिष्ठेचा सकाळ सन्मान २०२१ पुररूकारने सन्मानित केल्या बद्ल उरण व पनवेल तालुक्यांत समाजातर्फे गावोगावी सत्कार करण्यात येत आला.

२१ फेब्रुवारी रोजी खोपटे येथे फ्रेंड्स सर्कल ग्रुप व खोपटे काँग्रेस कमिटी तसेच २२ फेब्रुवारी रोजी काँग्रेस कमिटी धुतुम व भैरवानाथ क्रिकेट संघ धुतुम यांच्या वतीने राष्ट्रीय इंटक चे सचिव, कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या प्रसंगी माजी आमदार मनो-हरशेठ भोईर, जेष्ठ काँग्रेस नेते एल. डी म्हात्रे, जेष्ठ काँग्रेस कार्यकर्ते केशव घरत, महाराष्ट्र इंटक चे उपाध्यक्ष विनोद म्हात्रे, रायगड जिल्हा इंटक चे अध्यक्ष किरीट पाटील, न्यु मॅरीटाईम अॅन्ड जनरल कामगार संघटनेचे सरचिटणीस वैभव पाटील, उपाध्यक्ष मुरलीधर ठाकूर, माजी सरपंच शंकर ठाकूर, अमृत ठाकूर, माजी उपसपंच बळीराम ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, ग्र. पं. सदस्य अंगद ठाकूर, रविनाथ ठाकूर, शाखाप्रमुख कुंदन पाटील, रायगड जिल्हा इंटक चे सरचिटणीस विवेक म्हात्रे, उरण तालुका युथ इंटक चे अध्यक्ष राजेंद्र भगत, उरण तालुका युथ इंटक चे सरचिटणीस आदित्य घरत, संघटक योगेश रसाळ, सुजित म्हात्रे, समीर पाटील व मोठया संख्येने काँग्रेस कार्यकर्ते व फ्रेंड्स सर्कल चे पदाधिकारी उपस्थित होते.



## कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आज होणारा रुग्णवाहिका उद्घाटन सोहळा स्थगित

**दै.रायगड नगरी । पेण**

मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांना नेहमीच मदत करणारे देवदूत कल्पेश ठाकूर यांच्या साई सहारा प्रतिष्ठानच्या आज मंगळवार (दि.२३) रोजी होणाऱ्या रुग्णवाहिका उद्घाटन सोहळा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्थगित करण्यात आला आहे.

कल्पेश ठाकूर हे मागील १६ वर्षे मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांची विनामूल्य सेवा देत आहेत. आज पर्यंत त्यांनी सुमारे ४८५ रुग्णांचे जीव वाचविण्याचे कार्य केले आहे. कल्पेश ठाकूर यांच्या विनामूल्य, निरपेक्ष कार्याबद्दल अनेक सामाजिक संस्थांनी देवदूत हा पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले आहे. कल्पेश ठाकूर यांनी आपल्या या समाजकार्यात आणखी एक साहसी पाऊल पुढे टाकत अपघातग्रस्तांना त्वरित वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यासाठी स्वखर्चाने अत्याधुनिक रुग्णवाहिका उप-लब्ध केली. मात्र आज होणारा मोफत रुग्णवाहिका उद्घाटन सोहळा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्थगित करण्यात आला असून लवकरच सदर कार्यक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती साई सहारा प्रतिष्ठानने दिली आहे.

## एकदरा खाडीलगत ग्रोएन्स बंधारा बांधण्यात यावा : मुरुडच्या स्थानिक मच्छीमार बांधवांतर्फे आ.महेंद्रशेठ दळवी यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मच्छिमार व्यवसायात महत्त्वाचा गेल्या अनेक वर्षांपासून मागणी असलेला मुरुड जंजिरा येथील एकदरा खाडीलगत ग्रोएन्स बंधारा बांधण्यात यावा. अशी मागणी येथील स्थानिक मच्छीमार बांधवांतर्फे आमदार महेंद्रशेठ दळवी यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, मुरुड एकदरा खाडीमध्ये २५० नौका असून या खाडीत वाळू साचल्याने ये-जा करताना अनेक वेळा नौकांना अपघात झाले आहेत. भरती शिवाय याठिकाणी नौका किना-यावर लागत नाही. अनेक वर्षांपासून याठिकाणी ग्रोएन्स बंधारा बांधण्याची मागणी असून सन १९९५ मध्ये युती शासन असताना तत्कालीन मुख्यमंत्री यांनी आठकोटीचा बंधारा मंजूर करण्यात आला होता. अंतिम मोजणी देखील झाली होती. तवसाळकरवाडी पासून ते समुद्रात दिपस्तंभाचे बाजूस हे काम मंजूर झाले होते मात्र युती शासन बदलल्या नंतर अद्याप हे काम होऊ शकले नाही.

मासेमारीत मच्छिमार बांधवांच्या दृष्टीने हा बंधारा होणे आवश्यक असून यामुळे येथील खाडीची खोली वाढू शकते, दिवसा-रात्रौ खाडीमध्ये नौका ये-जा करु शकतात व नौकांचा अपघात टळू शकतो. कोळीवाड्यासमोर समुद्रात ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ला असल्याने पर्यटकांना सोयिस्कर होऊन पर्यटनाला चालना मिळेल. ग्रोएन्स बंधारा झाल्यास नौका किना-यावर लागून व्यवसाय व स्थानिकांना रोजगार मिळू शकेल तसेच पर्यटक पाण्यात बुडून मृत्यू चे अपघाघाताचे प्रमाण कमी होऊ शकेल. यासाठी मुरुड जंजिरा येथील एकदरा खाडीलगत ग्रोएन्स बंधारा बांधण्यात यावा. अशी मागणी स्थानिक मच्छीमार बांधवांतर्फे आमदार महेंद्रशेठ दळवी यांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी शिवसेनेचे माजी शहरप्रमुख बाळकृष्ण गोंजी, उपविभाग प्रमुख अमित गोंजी (कोळीवाडा), गटप्रमुख शक्ती फेंगडू, दिनेश पाटील शिवसैनिक उपस्थित होते.


**पनवेल महानगरपालिका**

**ता.पनवेल, जि.रायगड**

दि.२२/०२/२०२१

**निविदा सूचना**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | PMC/WS/22/2020-21 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तळोजे पाचनंद ओवे येथे तलावावरुन येणारी पाईपलाईन भूखंड क्र.ए.१० सेक्टर क्र.३९ ए येथून गेल्याने ती रोडच्या बाजूने वळती करून टाकणेबाबत. (दुसरी बोली) |

वरील ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.२४/०२/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदादारांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(तृप्ती सांडभोर)**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**